महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधि, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील वेतन प्रदान) नियम, १९८१ मधील नियम ६८ 
निलंबन काळातील निर्वाह भत्त्याच्या दराचे पुनर्विलोकन करण्याचा कालावधी कमी करणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्र. डीआरएम् १०८१/सीआर-८००/एसईआर-८.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १० डिसेंबर १९८१.

## शासन निर्णय

शासन असा आदेश देत आहे की निर्वाह भत्त्याच्या दराचे पुनर्विलोकन करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधि, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील वेतन प्रदान) नियम, १९८१ मधील नियम ६८ मध्ये विहित केलेला सहा महिन्यांचा कालावधी यापुढे तीन महिने असा कमी करण्यात यावा.

२. हे आदेश अंमलात आल्यानंतर, ह्या आदेशाच्या दिनांकास जे शासकीय कर्मचारी तीन किंवा अधिक महिने निलंबित असतील त्यांचे बाबतीत निर्वाह भत्त्याच्या दराचे तत्काळ पुनर्विलोकन करण्यात यावे. इतरांचे बाबतीत त्यांच्या निलंबनाचा कालावधि तीन महिने पूर्ण होताच निर्वाह भत्त्याच्या दराचे पुनर्विलोकन करण्यात यावे.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधि, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील वेतन प्रदान) नियम, १९८१ मधील नियम ६८ मध्ये यथावकाश बदल करण्यात येईल.

४. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

Office of The Collector
Ratnagiri
Inward No. ......
Date ......
12 APR 1982

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

अ.ना.कुलकर्णी,
शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (१५० प्रती),
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (७० प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य), (७० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
x प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

कृ.मा.प.

* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालय सर्व विभाग,
निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वेतन अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, कार्यासन एसआर-८, वित्त विभाग.

---

**Rule 68 of Maharashtra Civil Services (Joining Time, Foreign Service and Payments during Suspension, Dismissal and Removal) Rules,1981.**

**Reduction of the period for review of the rate of subsistance allowance during suspension.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Finance Department.**
**Resolution No.DRS 1081/CR-877/SER-8**
**Mantralaya, Bombay-400 032, Dated 10th December 1981.**

ISSUED ON 26/4

## RESOLUTION

Government is pleased to direct that the period of six months prescribed in Rule 68 of Maharashtra Civil Services (Joining Time, Foreign Service and Payments during Suspension, Dismissal and Removal) Rules,1981 for review of the rate of subsistance allowance should be reduced to three months.

2. On coming into force of these orders, a review should be made immediately in the case of Government servants who have been under suspension for three months or more on the date of these orders. In the case of others, the review should be undertaken after they complete three months under suspension.

3. Rule 68 of Maharashtra Civil Services (Joining Time, Foreign Service and Payments during Suspension, Dismissal and Removal) Rules, 1981 will be amended in due course.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A.N.KULKARNI,
Assistant Secretary to Government
Finance Department.

---